पुढारी

# जागतिक पातळीवरील शास्त्रज्ञांत मडिलगेच्या सुपुत्राचा समावेश

## कोल्हापूरच्या शिरपेचात मानाचा तुरा

गारगोटी/मडिलगे बुद्रुक : पुढारी वृत्तसेवा



डॉ. विनायक पारळे

मडिलगे बुद्रुक (ता. भुदरगड) येथील प्रा. विनायक पारळे यांना जागतिक शास्त्रज्ञ म्हणून बहुमान मिळाला आहे. त्यामुळे कोल्हापूरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. डॉ. पारळे सध्या दक्षिण कोरियातील योन्सई विद्यापीठात रिसर्च प्रोफेसर म्हणून कार्यरत आहेत.

एडी सायंटिफिक इंडेक्समार्फत जगातील नामांकित संशोधकाची यादी गुगल स्कॉलरचा आधार घेऊन तयार केली जाते. त्यांनी केलेल्या कार्याच्या निकषावरून त्यांचे नाव संशोधकांच्या यादीत आले आहे. विशेष बाब म्हणजे डॉ. पारळे यांनी ६० पेक्षा अधिक शोधनिबंध जागतिक स्तरावर प्रसिद्ध केले आहेत. या शोधनिबंधातून इतर संशोधक संदर्भ घेतात. गेल्याच महिण्यात त्यांना सायन्स फादर या नामांकित संस्थेने युवा शास्त्रज्ञ हा पुरस्कार देऊन गौरविले आहे.

डॉ. पारळे यांनी पहिले ते माध्यमिकपर्यंतचे शिक्षण मडिलगे बुद्रुक येथे केले आहे. पदव्युत्तर व पीएच.डी. पर्यंतचे शिक्षण शिवाजी विद्यापीठात पूर्ण केले. पुढे त्यांनी संजय घोडावत व आर.आय.टी. आदी संस्थामध्ये अध्यापनाचे कार्य केले आहे. २०१६ मध्ये ते पोस्ट डॉक्टरेटसाठी दक्षिण कोरियात योन्सई विद्यापीठात प्राध्यापक म्हणून रुजू झाले. तेथे ते रिसर्च प्रोफेसर म्हणून काम पहात आहेत. त्यांनी आजपर्यंत अनेक आंतराष्ट्रीय परिषदेत व्याख्याने दिली आहेत. १०० हून अधिक कार्यशाळा व प्रशिक्षणे, राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे यामध्ये सहभाग दर्शविला आहे.

लोकमत

# मोहोळकर, पारळे, तरवाळ ठरले जागतिक शास्त्रज्ञ

## एडी सायंटिफिक इंडेक्स संस्थेचे सर्वेक्षण

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** एडी सायंटिफिक इंडेक्स संस्थेने घेतलेल्या सर्वेक्षणात कोल्हापुरातील प्रा. डॉ. आण्णासाहेब मोहोळकर, डॉ. विनायक पारळे व डॉ. एन. एल. तरवाळ यांनी जगातील नामांकित शास्त्रज्ञांमध्ये स्थान मिळाले आहे. या संस्थेमार्फत जगातील नामांकित शास्त्रज्ञांची यादी गुगल स्कॉलरचा आधार घेऊन जाहीर करण्यात आली. त्यामध्ये त्यांचा समावेश आहे.



आण्णासाहेब मोहोळकर

या क्रमवारीत स्थान मिळविणारे प्रा. मोहोळकर हे शिवाजी विद्यापीठातील पदार्थविज्ञान विभागात सहायक प्राध्यापक आहेत. गतवर्षी अमेरिकेच्या स्टॅनफोर्ड विद्यापीठाने घेतलेल्या सर्वेक्षणात त्यांना जागतिक क्रमवारीत टॉप टू परसेंट शास्त्रज्ञांच्या यादीमध्ये स्थान मिळाले होते. त्यांना २९ वर्षे संशोधनातील अनुभव आहे. सौरऊर्जा, गॅस सेन्सिंग, सुपरकॅपॅसिटरबाबतचे त्यांनी पेटंट मिळविले आहेत. मडिलगे (ता. भुदरगड) येथील डॉ. विनायक पारळे दक्षिण कोरियाच्या योन्सई विद्यापीठात रिसर्च प्रोफेसर आहेत. ते ऐरोजेल या आव्हानात्मक पदार्थावर संशोधन करीत आहेत. त्यांचे मार्गदर्शक डॉ. एच. एच. पार्क आणि टीमला पुढील संशोधनासाठी कोरियन गव्हर्न्मेंटकडून शंभर कोटींचा निधी प्राप्त झाला. दुंडगे (ता. चंदगड) येथील डॉ. एन. एल. तरवाळ हे शिवाजी विद्यापीठातील पदार्थविज्ञान अधिविभागात सहाय्यक प्राध्यापक आहेत. ते गत १५ वर्षांपासून मटेरियल सायन्समधील सोलार सेल, गॅस सेन्सर, सुपरकॅपॅसिटर, एलेक्ट्रोक्रोमिझम, सुपरहायड्रोफोबिसिटी, मेमरीस्टर या क्षेत्रात संशोधन करत आहेत. त्यांनी दक्षिण कोरिया येथून पोस्ट डॉक्टरेट पूर्ण केले. हे तिन्ही शास्त्रज्ञ गरजू, गरीब विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणासाठी मदतीचा हात देतात.





विनायक पारळे एन. एल. तरवाळ

### क्रमवारी ठरविताना हे निकष

शोधनिबंध, एच इंडेक्स, आय टेन इंडेक्स, संशोधन संबंधित रिव्युव्हर, एडिटर म्हणून केलेल्या कामगिरी, आदी निकषांच्या साहाय्याने ही क्रमवारी ठरविली जाते.

पुढारी

# एम.फिल.,पीएच.डी. शोधप्रबंध सादर करण्यास ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

कोल्हापूर : एम. फिल., पीएच. डी.चा शोधप्रबंध सादर करण्यासाठी ३१ डिसेंबर २०२१ पर्यंत मुदतवाढ द्यावी, असे परिपत्रक विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) शिवाजी विद्यापीठास पाठविले आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी देशभर लॉकडाऊन केल्याने वर्षभरापासून शिक्षण संस्था, विद्यापीठे बंद आहेत. परिणामी एम. फिल., पीएच.डी.च्या विद्यार्थ्यांना शोधप्रबंध तयार करण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे. शोधप्रबंध सादरीकरणासाठी मुदतवाढ द्यावी अशी विद्यार्थ्यांकडून मागणी होत होती. त्यामुळे मुदतवाढ दिली आहे, याची विद्यार्थ्यांनी दखल घ्यावी, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

तरूण भारत

# पदव्युत्तरच्या ऑनलाईन परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत एमए, एमकॉम, एमएस्सी या पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या नियमित व रिपीटरच्या ५५ ऑनलाईन परीक्षांना सोमवारपासून सुरूवात झाली. या परीक्षा सुरळीत पार पडल्या. परंतु अर्थशास्त्र विभागाकडून तांत्रिक अडचणीमुळे विद्यार्थ्यांचा परीक्षा अर्जच भरला गेला नसल्याने गोंधळाचे वातावरण होते. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी परीक्षेत गोंधळ झाला नसल्याचे सांगितले. मंगळवारी ११ हजार १२८ पैकी १० हजार ४९४ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिली. अर्थशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांना आयडी, पासवर्ड मिळाला नाही.